# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

## दिनांक : 14.04.2024 वार - रविवार

------------------------------------------------------------------------------------------------

१. विकसित भारताचं ध्येय गाठण्यासाठी विज्ञान तंत्रज्ञानांच्या जोडीनं अग्रेसर राहण्याचं माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांचं विद्यार्थ्यांना आवाहन

२. गेमिंग क्षेत्रातील अग्रणीशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी साधला संवाद

३. दृष्टिबाधित व्यक्तींना स्पर्शानं समजण्याजोग्या नकाशांच्या पुस्तकाचं राज्यपालांच्या हस्ते प्रकाशन आणि

४. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त राज्यात विविध उपक्रमांचं आयोजन

**राष्ट्रपती**

विद्यार्थ्यांनी आपलं निश्चित ध्येय साध्य करण्यासाठी परिश्रम हे एक शस्त्र घेऊन पुढे जावं तसंच 2047 पर्यंत विकसित भारताचं ध्येय गाठण्यासाठी सर्व क्षेत्राच्या प्रगतीबरोबर विज्ञान तंत्रज्ञानांच्या जोडीनं अग्रेसर राहण्याचा संकल्प केला पाहीजे असं आवाहन माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी काल पुण्यात केलं. पिंपरी इथल्या डॉक्टर डी. वाय पाटील अभिमत विद्यापीठाच्या पंधराव्या पदवीप्रदान सोहोळ्यात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचे अध्यक्ष सोमनाथ एस. यांना त्यांच्या अवकाश संशोधन क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी आणि सिम्बायोसिसचे संस्थापक अध्यक्ष एस.बी. मुजुमदार यांना शैक्षणिक क्षेत्रातील उत्कृष्ठ योगदानाबद्दल मानद डॉक्टर ऑफ सायन्स ही पदवी माजी राष्ट्रपतींच्या हस्ते प्रदान करण्यात आली.

**गेमिंग**

भारतातील गेमिंग क्षेत्रात अग्रणी असलेल्या सात जणांशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल संवाद साधला. गेमिंग क्षेत्रातील नव्या बदलांबाबत मोदी यांनी गेमर्सशी चर्चा केली. गेमिंग आणि इ स्पोर्ट्स क्षेत्राला चालना देण्यासाठी सरकार नक्की सहाय्य करेल असं आश्वासन मोदी यांनी यावेळी दिलं. त्याच बरोबर गेमिंग च्या माध्यमातून पौराणिक कथा आणि हवामान बदला संदर्भात जनजागृती करण्याचं आवाहनही मोदी यांनी गेमर्सना केलं. गेमिंग आणि जुगार यामधील फरकासंदर्भातही मोदी यांनी चर्चा केली. नवी मुंबई इथल्या नमन माथुर या गेमरचा या बैठकीत समावेश होता.

**फडणवीस**

हिंदू समाजाची शक्ती संपवण्याची भाषा करणाऱ्या काँग्रेसला त्यांची जागा दाखवून द्या असं आवाहन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यवतमाळ जिल्ह्यात वणी इथं काल जाहीर सभेत केलं. चंद्रपूर आर्णी मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रचार सभेत ते बोलत होते.

**रागा**

प्रसार माध्यमं आणि पंतप्रधान बेरोजगारी आणि महागाई या विषयावर बोलत नाहीत असा आरोप काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी काल  गोंदिया भंडारा लोकसभा मतदारसंघातील काँग्रेसचे उमेदवार प्रशांत पडोळे यांच्या प्रचारार्थ साकोली इथं आयोजित सभेत केला. काँग्रेस पक्षानं आपला  जाहीरनामा खूप विचार करुन आणि देशभरातील लाखो लोकांना भेटून बनवला आहे. त्यामुळे हा  जाहिरनामा खऱ्या अर्थाने 'जन की बात' आहे असंही  राहुल गांधी यावेळी बोलताना म्हणाले.

**<u>गोविंदा रोड शो</u>**

वाशीम यवतमाळ लोकसभा मतदारसंघाच्या उमेदवार राजश्री पाटील यांच्या प्रचारार्थ काल वाशीम इथं चित्रपट कलाकार गोविंदा यांच्या भव्य पदफेरीचं आयोजन करण्यात आलं होतं.

**<u>गृह मतदान</u>**

अकोला लोकसभा मतदार संघात कालपासून गृह मतदानाला प्रारंभ झाला. रिसोड  तालुक्यातील करडा या गावातून सुरुवात करण्यात आली.  सर्वप्रथम बहिणाबाई देशमुख या आजीबाईंनी आपला मतदानाचा हक्क बजावला. जिल्ह्यात 726 दिव्यांग आणि 85 वर्षापुढील 1 हजार 632 मतदार अशा 2 हजार 358 मतदारांना गृह मतदानाची सुविधा देण्यात आली आहे. या सुविधेमुळं दिव्यांग तसंच ज्येष्ठ मतदारांनी आनंद आणि समाधान व्यक्त केलं आहे.

**<u>निवडणूक सज्जता</u>**

यवतमाळच्या जिल्हाधिकाऱ्यांनी मतदान केंद्रांच्या सज्जतेचा सविस्तर आढावा घेतला. येत्या निवडणूकीत किमान 75 टक्के मतदानाचं उद्दिष्ट गाठण्याच्या दृष्टिनं प्रत्येक मतदारापर्यंत व्होटर स्लिप पोहोचवण्याचे काम सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी स्वत: लक्ष घालून करावं  असे निर्देश जिल्हाधिकारी डॉक्टर पंकज आशिया यांनी बैठकीत दिले.

कोल्हापूर जिल्ह्यात लोकसभा निवडणूका शांततेत आणि सुरळीत पार पाडण्यासाठी आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी, असं  आवाहन जिल्हाधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी अमोल येडगे यांनी केलं. येडगे यांच्या अध्यक्षतेखाली काल जिल्ह्यातील सर्व राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची बैठक घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते.

तेरा मे रोजी होणाऱ्या मावळ लोकसभा मतदारसंघातील निवडणुकीसाठी पिंपरी विधानसभा कार्यालयांतर्गत नियुक्त करण्यात आलेले अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना काल  प्रशिक्षण देण्यात आलं.

लातूर लोकसभा मतदारसंघासाठी नियुक्त करण्यात आलेले निवडणूक खर्च निरीक्षक संजीब बॅनर्जी यांनी लातूर लोकसभा निवडणूक खर्चविषयक विविध समिती, पथकांचा आढावा घेतला.

**<u>दृष्टि बाधितांसाठी नकाशे</u>**

दिव्यांग व्यक्तींना देशाच्या सामाजिक, आर्थिक प्रगतीमध्ये योगदान देण्यासाठी सक्षम करणं आवश्यक आहे असं प्रतिपादन राज्यपाल रमेश बैस यांनी काल केलं. दृष्टिबाधित व्यक्तींना स्पर्शाने समजण्याजोग्या 'इन्क्लुसिव्ह ॲटलास इंडिया 2024' या नकाशांच्या पुस्तकाचं काल मुंबईतील राजभवनात प्रकाशन करताना ते बोलत होते. नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड या संस्थेनं ब्रेल तसंच सामान्य लिपीतून हा नकाशा तयार केला आहे. दिव्यांगांना शिकविण्यात येणारी अनेक कौशल्यं कालबाह्य होण्याची शक्यता असून त्यांना तंत्रज्ञानाच्या मदतीनं कृत्रिम प्रज्ञा कौशल्यांच्या बाबतीत अवगत करणं आवश्यक आहे, असं मतही राज्यपालांनी व्यक्त केलं.

**<u>आंबेडकर जयंती</u>**

भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वतीनं दादर-स्थित चैत्यभूमी इथलं डॉक्टर आंबेडकर यांचं स्मारक, 'राजगृह' इथलं निवासस्थान तसंच परिसरात नागरी सेवासुविधांसह विविध तयारी करण्यात आली आहे.

दरवर्षीप्रमाणे यंदाही महानगरपालिकेच्या जनसंपर्क विभागामार्फत चैत्यभूमी इथं डॉक्टर आंबेडकर यांच्या जीवनावर आधारीत छायाचित्रांचं प्रदर्शन भरवण्यात आलं आहे.

धाराशिव इथल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रूग्णालयांतर्गत शासकीय परिचारिका महाविद्यालयाच्या दोनशे विद्यार्थ्यांनी काल सलग बारा तास अभ्यास करून तसंच बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील विविध प्रसंग रांगोळीच्या माध्यमातून साकारत बाबासाहेबांना आदरांजली वाहिली.

तर हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी  तालुक्यातील मातोश्री सावित्रीबाई फुले आदिवासी विद्यालय, कवडा इथल्या विद्यार्थ्यांनी भव्य रांगोळीच्या माध्यमातून बाबासाहेबांना अभिवादन करत मतदान जनजागृतीही केली.

नांदेड जिल्हा पोलीस दल आणि राम मनोहर लोहिया प्रतिष्ठान विकास मंडळ यांच्या वतीने जिल्ह्यात ही जयंती कशी साजरी करावी याबाबत कलापथकाच्या माध्यमातून जनजागृती अभियान काल राबवण्यात आलं.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त बीड जिल्ह्यातील  गेवराई शहरात आयोजित करण्यात आलेल्या भिमज्योती महोत्सवात, र.भ. अट्टल महाविद्यालयाच्या मैदानावर वीस हजार वह्यांच्या माध्यमातून डॉक्टर आंबेडकर यांना अनोख्या पद्धतीनं आदरांजली अर्पण करण्यात आली.

**<u>जनजागृती</u>**

मुंबई जिल्ह्यात मतदानाचा टक्का वाढावा यासाठी निवडणूक प्रतिज्ञा, स्वाक्षरी मोहीम, मिरवणुका काढणं अशा विविध माध्यमातून मतदारांचं प्रबोधन करण्यात येत आहे.

याअंतर्गत, काल वर्सोवा इथं झालेल्या एका कार्यक्रमात, लोकशाहीनं आम्हालाही भारताचे नागरिक म्हणून सन्मान दिला आहे. मतदानाचा अधिकार दिला आहे. हा अधिकार आम्ही बजावणार आणि लोकशाहीत आमचं महत्व सिद्ध करणार, अशी तृतीयपंथी मतदारांनी शपथ घेतली.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट, जिल्हा निवडणूक कार्यालय आणि पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीनं दोन दिवसीय युवा परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.  यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांनी शंभर टक्के मतदान करण्याची शपथ घेतली. या परिषदेत तज्ज्ञांच्या मार्गदर्शनासह विविध चर्चासत्रांचं आयोजन करण्यात आलं होतं.

**<u>पाऊस नुकसान</u>**

जळगाव जिल्ह्यातील जामनेर तालुक्यात नुकत्याच झालेल्या अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्यानं झालेल्या शेतीच्या नुकसानीची काल जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी पाहणी केली.  या पावसाचा बाजरी,मका, केळी आणि इतर पिकांना फटका बसला असून या नुकसानाचे  पंचनामे तातडीने पूर्ण करून अहवाल सादर करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आहेत.

जालना जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांत वादळी वारा आणि अवकाळी पावसामुळं ८७४ शेतकऱ्यांच्या सुमारे ४०४ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाल्याची माहिती जिल्हा प्रशासनानं दिली आहे. सांगली जिल्ह्यात जत आणि कवठेमहांकाळ तालुक्यातील काही भागात विजा तसच वादळी वाऱ्यासह काल पाऊस पडला. जत तालुक्यात गारपीट पाहायला मिळाली.

**हवामान**

मराठवाड्यात तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडेल. मध्य महाराष्ट्रात आकाश अंशतः ढगाळ राहील. विदर्भात तुरळक ठिकाणी जोराचे वाहण्याचा इशारा देण्यात आला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.